# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २ जुलै, २०२६

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री :** शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वैद्यकीय शिक्षण मंत्री :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे व सन २०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) वने मंत्री :**

**(क)** महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल आणि लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ मधील अनुसुची मधील {२ साग (Teak)} वृक्ष वगळण्याबाबतची अधिसूचना क्र.टिआरएस-१०/२०२५ प्रक्र.२४४/फ-६ दि.०९-०६-२०२६ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : औचित्याचे मुद्दे**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री. सुनिल शेळके, शंकर मांडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अदानी एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड मार्फत खावडा फेज-IV पार्ट-D या अतिउच्चदाब विद्युत पारेषण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत असून सदर पारेषण वाहिनी पुणे जिल्ह्यातील मावळ व मुळशी तालुक्यातील सुमारे ४२ गावांमधून प्रस्तावित करण्यात आली असणे, सदर प्रकल्पामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनींवर विद्युत मनोरे उभारण्यात येत असून त्यांच्या जमिनीवर कायमस्वरूपी निर्बंध निर्माण होत असणे, तसेच पारेषण वाहिनीच्या सुरक्षा पट्ट्याखालील क्षेत्रात शेती, बागायती, वृक्षलागवड व इतर विकासकामांवर मर्यादा येणार असून यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनींच्या बाजारमूल्यावर प्रतिकूल परिणाम होऊन भविष्यातील उत्पन्नाच्या संधीही कमी होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, मात्र बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला हा प्रचलित बाजारभाव, जमिनीचे वास्तविक मूल्य, सिंचन सुविधा, फळबागा, उभी पिके तसेच जमिनीच्या भविष्यातील वापर क्षमतेतील घट यांचा पुरेसा विचार न करता तसेच बाधित शेतकऱ्यांशी पुरेशी चर्चा न करता निश्चित करण्यात आल्याची शेतकऱ्यांची असलेली तक्रार, अनेक गावांतील शेतकऱ्यांनी सध्याचे मूल्यांकन अन्यायकारक असल्याने त्यास विरोध दर्शविला असून वाढीव मोबदला देण्याची केलेली मागणी, प्रशासनाला निवेदने देऊनही या बाधित शेतकऱ्यांच्या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.वरुण सरदेसाई, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरामधील वाहतूकीसाठी अत्यंत महत्वाचा प्रमुख मार्ग असलेल्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर एलईडी लाईट स्क्रीन होर्डींग उभारतांना बृहन्मुंबई महानगरपालिका, गृह विभाग आदिंची परवानगी घेणे बंधनकारक असतांनाही नियमांचे उल्लंघन करुन द्रुतगती महामार्गावर एलईडी लाईट स्क्रीन होर्डींग उभारण्यात आल्याचे नुकतेच माहे जून, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, तसेच सदर महामार्गावरील वांद्रे सी- लिंकपासून वाकोला फ्लायओव्हरपर्यंत दाट वस्तीच्या भागात विनापरवाना व निविदा प्रक्रिया न राबविता होर्डींग उभारण्यात येत असल्याप्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पावसाळयात होर्डींग कोसळून दुर्घटना झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडलेल्या असणे, त्यांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता, सदर होर्डींग उभारण्याकरिता होर्डींग मालक आजुबाजूच्या झाडांची सर्रासपणे कत्तल करीत असणे, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्थानिक पोलीस स्टेशनला तक्रार करुनही गुन्हा दाखल न होणे, बेकायदेशीर व विनापरवानगी उभारण्यात आलेल्या द्रुतगती महामार्गावरील एलईडी लाईट स्क्रीन व होर्डींग संदर्भात चौकशी / पाहणी

करुन तात्काळ होर्डींग काढून टाकण्याबाबत तसेच संबंधित मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यास पूर्वेला तुंगारेश्वर, पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेला वैतरणा खाडी आणि दक्षिणेला उल्हास खाडीने वेढलेले असणे, वसई विरार महानगरपालिकेच्या स्थापनेला १६ वर्षे होऊनही शहरात' एकात्मिक भुयारी गटार व्यवस्था तसेच संपुर्ण शहरासाठी नवीन ‘स्टॉर्म वॉटर ड्रेनेज मास्टर प्लॅन’ तयार केलेला नसणे, सन २०१७ व २०१९ मधील वसईतील अतिवृष्टीनंतर ‘राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (NEERI)’ सन २०२० मध्ये सादर केलेल्या अहवालात सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास महानगरपालिकेची असलेली उदासिनता, नालेसफाईतील कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचारात वरिष्ठ अधिकारी सहभागी असल्याने नालेसफाई हा केवळ एक फार्स ठरणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वर्षभर पाठपुरावा करूनही नैसर्गिक प्रवाह मार्गातील कांदळवन स्थलांतरासाठी आवश्यक परवानग्या घेण्याची कार्यवाही न करणे, सखल भागात ठिकठिकाणी झालेली अनधिकृत बांधकामे आणि बेकायदा माती/डबर भरणी शोधून त्यावर कारवाई करण्यास होणारे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे सोयीस्कर व अर्थपूर्ण दुर्लक्ष, परिणामी दिनांक २३ व २४ जून, २०२६ रोजीच्या मुसळधार पावसाने संपूर्ण वसई- विरार - नालासोपारा जलमय होऊन नागरिकांची घरे व दुकानांत पाणी शिरल्याने अतोनात नुकसान होणे, यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र संताप, यासाठी अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याने याची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि कायमस्वरूपी पूरनियंत्रण आराखडा राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"लिंक रोड, गोरेगाव (पश्चिम) येथे असलेल्या खाडीत मोठ्या प्रमाणात तिवरांची झाडे व कांदळवन असणे, गेल्या अनेक वर्षात त्याठिकाणी मानवी वस्ती तयार झालेली असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात कांदळवन नष्ट करण्यात येत असणे, दिवसेंदिवस तिवरांच्या झाडांची कत्तल होत असणे, खाडीत भराव टाकून अनधिकृत घरे उभी रहात असणे, दुमजली तीमजली इमारती सदृश्य निवासी अनिवासी खोल्या उभारण्यात येत असणे, या अनुषंगाने वने विभाग, महसूल विभाग व मुंबई महानगरपालिका यांच्यात यावरील कारवाईबाबत स्पष्टता व समन्वय नसणे, यामुळे पर्यावरणाची होत असलेली हानी, स्थानिक नागरिकांमध्ये याबाबत पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) श्री.गोपिचंद पडळकर, ॲड. राहुल ढिकले, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यात वडार, कांचिकोरवी, शिकलकारी, वैदु, डोंबारी, कैकाडी, वाल्मिकी, टकारी इत्यादी अत्यंत मागास, भूमिहीन भटके-विमुक्त समुदायांचा 'वराह पालन' हा प्राचीन पारंपरिक व्यवसाय असणे, वराह पालन करून ते आपली उपजिविका भागवत असणे, त्यामुळे वराह कळप ही त्यांची 'फिरती बँक' असणे, मात्र राज्यात याबाबत ठोस धोरण नसल्याने सदर व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असणे, नुकतीच अहिल्यानगर महानगरपालिकेने वराह पालकांवर अमानवी कारवाई करून त्यांची वराहे जप्त केल्याने या समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, परिणामी या समाजातील सुशिक्षित व अशिक्षित तरुण बेरोजगार झालेले असणे, त्यामुळे या समाजातील गुन्हेगारीचा दर वाढला असणे, जागतिक स्तरावर वराह पालन हा किफायतशीर उद्योग असणे, चीन, डेन्मार्क इत्यादी देशांनी आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे या व्यवसायात क्रांती घडवलेली असणे, परंतु महाराष्ट्रात वराह व्यवसायाशी निगडीत आधुनिक कत्तलखाने व प्रक्रिया उद्योग नसल्याने त्याचा वराह पालन करणाऱ्या समाजाला मोठा आर्थिक फटका बसत असणे, त्यानुषंगाने राज्यात 'महाराष्ट्र वराह प्रजनन व विकास धोरण' तातडीने लागू करणे, या व्यवसायाला 'कृषी व उद्योग' दर्जा देणे, वराह पालन करणाऱ्या समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, या व्यवसायाशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कत्तलखाने व प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**सात : शासकीय विधेयके :-**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(ब) **विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम**, **वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**आठ : (बुधवार**, **दिनांक ०१ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित,**

**धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी, अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी 'जेम' पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व

रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी ‘मुंबई क्लीन लीग’ स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन ‘वेस्ट टु एनर्जी’ तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुनर्विकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी ‘दत्तक वस्ती योजना’ अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे, साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता,

कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पवार, अमिन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षीरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहूल पाटील, श्री. रोहित पाटील डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनील राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्राविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यातील विद्यमान सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर पूर्णपणे अपयशी ठरले असून विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे, राज्यात महावितरणचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून ग्रामीण भागात कोणतीही पूर्वकल्पना न देता ८ ते १० तास अघोषित लोडशेडिंग केली जाणे, वाढीव आणि चुकीची वीज बिले देऊन सर्वसामान्यांची लूट सुरू असणे, ट्रान्सफॉर्मर (डीपी) जळाल्यास तो बदलून मिळण्यासाठी शेतकऱ्यांना महिनाभर ताटकळत राहावे लागणे, पूर्वसूचनेशिवाय आणि विश्वासात न घेता 'स्मार्ट मीटर' सक्तीने लावण्यात येणे, या स्मार्ट मीटरमुळे वीज बिल दुप्पट-तिप्पट येत असून, रिचार्ज संपताच वीज खंडित होत असणे, नियोजनाचा अभाव असलेल्या शहरीकरणामुळे महानगरे आणि नगरपालिका क्षेत्रांचे रूपांतर कचराकुंडीत झाले असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करोडो रुपयांचा होत असलेला गैरव्यवहार, बोरीवली नगर भूमापन ६४२ च्या ठिकाणी नगर भूमापन अधिकारी यांना हाताशी धरुन चुकीचा नकाशा तयार करणे आणि एफएसआय वाढवून विकासकास २०० कोटी रुपयांचा फायदा करुन देणे, दिडोंशी येथील पद्मावती नगर येथे सन २०१२ पासून विकासकाने पुनर्वसन न करता ८० घरमालकांना बेघर करणे, मिरा-भाईंदरमधील लोकप्रतिनिधींनी अधिकारांचा दुरुपयोग करुन अनधिकृत बांधकाम करणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये टीडीआर नियमावलीत बेकायदेशीर बदल करून ठराविक बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा देण्यात येणे, धारावी पुनर्वसन प्रकल्पात स्थानिक रहिवासी, छोटे उद्योजक आणि कष्टकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान सुरू असून अपात्रतेच्या नावाखाली हजारो गोर-गरिबांना मुंबईबाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरु असणे, कुर्ला, मुलुंड

आणि मुंबईतील इतर मोक्याच्या शासकीय जमिनी प्रकल्पांच्या नावाखाली विकासकांच्या ताब्यात दिल्या जात असणे, रस्त्यांच्या विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आणि निष्कृष्ट दर्जाची झालेली असणे, मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास न गेल्याने कोकणातील पर्यटनावर झालेला परिणाम, मुंबई-गोवा महामार्गासह सागरी महामार्गाचे काम अपूर्ण असताना शासनाने मुंबई ते गोवा ग्रीनफिल्ड हायवेची घोषणा करूनही गेल्या ३ वर्षात त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, मोक्याचे आणि कोट्यवधी रुपये किमतीचे शासकीय भूखंड कवडीमोलाने मर्जीतील संस्था आणि उद्योगपतींना बहाल करण्यात येणे, गरिबांच्या घरांसाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनींची खुली लूट सुरु असणे, राज्यात विशेषत: बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, मौजे चिंचपूर तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील इनाम दर्गाह जमीन हस्तांतरण प्रकरण महसूल विभागाने जाणीवपूर्वक पुनर्निरीक्षणातून वगळले असणे, देवस्थान जमिनी घोटाळ्यांवर अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, मीरा भाईंदर तसेच येऊर जिल्हा ठाणे येथील आदिवासी जमिनींचा गैरव्यवहार, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, सरकारची परवानगी न घेता आदिवासींच्या जमीनी हडप करणे, भिवंडी येथील भूमी वर्ल्ड या विकासकाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शॉपिंग मॉल उभारणे, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, महाराष्ट्रात वारंवार उघडकीस येत असलेले विविध प्रकारचे जमीन घोटाळे त्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री.शंकर जगताप, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पिंपरी-चिंचवड शहराची वाढती गरज लक्षात घेता मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी मिळावे अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २ डिसेंबर २०२३ मध्ये शासनाकडे करणे, शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिन १३५ लिटर पाण्याची गरज भासणे, सध्या पवना धरणातून ५१० एमएलडी आणि एमआयडीसी कडून ३० एमएलडी आणि आंध्रा धरणातून ७० एमएलडी एवढे असा दररोज ६१० एमएलडी पाणी दिवसा उद्योग नगरीत नागरिकांना पुरविण्यात येणे, शहराची लोकसंख्या आगामी १० वर्षात दुप्पटीने वाढणार असणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये हिंजवडी, माण, मारुंजी, जांभे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश झाल्यास शहराला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची

आवश्यकता, चिंचवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पाण्याचे स्त्रोत याबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून एकत्रित अहवाल तयार करण्यात येणे, मुळशी धरणातून बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या मोजमापासाठी मीटर बसविण्याची आवश्यकता, मुळशी धरणातील पाणी आरक्षित केल्यास तसेच धरणाची उंची वाढविल्यास पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए विभागातील रहिवाश्यांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होणार असणे, नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत भामा आसखेड धरणातून १३७ एमएलडी पाणी उचलणे व शेतजमीन पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून सविस्तर अहवाल तयार करून उद्योगनगरीला पाणीपुरवठा देण्याबाबत सकारात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुळशी धरणातून महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जलसंपदा विभागाव्दारे २१५ एमएलडी पाण्याची मागणी व आरक्षणाची मागणी असणे, मुळशी धरणातील टाटा पॉवर मालकीच्या तीनशे मेगावॅट क्षमतेचा हायड्रोपॉवर जनरेशन करार हा सन २०३१ मध्ये संपत असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड, पुणे व पीएमआरडीए हद्दीत वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता आगामी ३० वर्षाचे नियोजन करण्यासाठी कमीत कमी १० टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची व्यवहर्यता तपासण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.हारुन खान, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील मानखुर्द येथे चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या ताब्यात असलेल्या सुमारे ५५ एकर शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमण, व्यावसायिक गैरवापर आणि प्रशासकीय निष्काळजीपणाचे प्रकरण माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस येणे, अनाथ, निराधार आणि विशेष काळजीची गरज असलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी राखीव असलेल्या या जागेवर गेल्या अनेक वर्षांत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर गोदामे, कमर्शियल शेड्स आणि व्यावसायिक बांधकामे उभारण्यात येणे, सार्वजनिक व कल्याणकारी उद्देशासाठी राखीव असताना कोणतीही वैधानिक परवानगी न घेता व्यावसायिक वापर केल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा होत असलेला गैरवापर, मुलांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली संरक्षक भिंत तोडून निवासी इमारतींसमोर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याने बालकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होणे, शासनाने या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.राजेश पवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदेड शहरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे, याबाबत महावितरणकडून तांत्रिक कारण दिले जात असून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यास

महावितरण अपयशी ठरणे, पावसाळा किंवा वाऱ्याच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी लाईन मेंटेनन्स व इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करण्यासाठी निधीची असलेली आवश्यकता, नांदेड शहरासाठी सर्व विभागांचा समन्वय साधून (महानगरपालिका, वाहतूक पोलीस, महावितरण) संयुक्त कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता, शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी डिजिटल/ ऑनलाइन प्रणाली कार्यरत करुन त्या तक्रारींचे निवारणही वेळेत करण्याची आवश्यकता, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मूलभूत नागरी सुविधांच्या उभारणीसाठी शासनाने दीर्घकालीन योजना (Long term Master Plan) तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ४ व ५)**

**(४) श्री.हेमंत ओगले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या दूध, दही, पनीर, खवा, मिठाई, तूप, खाद्यतेल, कडधान्ये व इतर विविध खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत असणे, भेसळयुक्त पदार्थांमध्ये रासायनिक द्रव्ये, कृत्रिम रंग व आरोग्यास घातक घटकांचा वापर होत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होणे, तज्ज्ञांच्या मते अशा पदार्थांच्या सेवनामुळे पचनसंस्था, यकृत, मूत्रपिंड तसेच मेंदूवरही विपरीत परिणाम होण्याचा धोका वाढत असणे, विशेषतः सणासुदीच्या काळात भेसळीचे प्रमाण वाढत असून भेसळ माफियांचे जाळे राज्यभर सक्रिय असल्याची गंभीर बाब समोर येणे, अन्न व औषध प्रशासनाकडून अधूनमधून कारवाई केली जात असली तरी ती अपुरी ठरत असून भेसळ रोखण्यासाठी सातत्यपूर्ण व प्रभावी यंत्रणा कार्यरत नसल्याची नागरिकांमध्ये असलेली भावना त्यामुळे राज्यातील भेसळयुक्त खाद्यपदार्थांच्या वाढत्या प्रमाणाची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन भेसळ माफियांविरुद्ध कठोर कारवाई करावी, नियमित तपासणी मोहिमा राबवाव्यात तसेच नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.महेश लांडगे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्राची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने पवना बंद जल वाहिनी प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असणे, सदर प्रकल्पास शासनाची मंजुरी मिळूनही विविध प्रशासकीय, तांत्रिक व जमीन संपादनासंबंधी कारणांमुळे प्रकल्पास विलंब होणे, या विलंबामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणी पुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून भविष्यात गंभीर पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता, पवना बंद जलवाहिनी

प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रकल्पासाठी मंजूर व वितरित निधी किती, प्रकल्पाच्या अंमलबजावणीत येणारे प्रमुख अडथळे कोणते, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने निश्चित केलेली कालमर्यादा काय याबाबत प्रशासनाकडून माहिती घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता, पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणी सुरक्षेसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.प्रशांत बंब, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सध्या मुलींसाठी विवाहाचे किमान कायदेशीर वय १८ वर्षे आणि मुलांसाठी २१ वर्षे असणे, या वयात मोठ्या प्रमाणावर युवक युवती उच्च शिक्षण घेत असणे, कौशल्य विकासाच्या प्रक्रियेत असणे, किंवा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेले नसणे, विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक निवड नसून ती आयुष्यभराची सामाजिक आर्थिक कौटुंबिक आणि कायदेशीर जबाबदारी असणे,अलीकडच्या काळात राज्यात पालकांच्या संमतीशिवाय घरातून निघून जाऊन विवाह करण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अशा विवाहांपैकी अनेक विवाह हे भावनिक आवेग, अल्प जीवनानुभव, अपुरी आर्थिक क्षमता, अपूर्ण शिक्षण आणि वैवाहिक जीवनाविषयी पुरेशी समज नसणे, पालकांच्या विरोधामुळे बेपत्ता तक्रारी, अपहरणाचे गुन्हे, धमक्या, मारहाण, सनमानहत्येसदृश्य घटना आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, पळून जाऊन लग्न केल्यामुळे पालकांना सामाजिक अपमान, मानसिक धक्का, आर्थिक नुकसान होणे, मुलींचे लग्नाचे वय १८ व मुलांचे २१ वर्षे असावे. परंतू मुला मुलींना मर्जीने लग्न करायचे असल्यास व पालकांचा त्यांना विरोध असल्यास मुलीचे किमान विवाहाचे वय १८ वरून २१ वर्षे व मुलाचे किमान विवाहाचे वय २१ वरून २४ वर्षे करण्याबाबत कायदेशीर बंधने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया तसेच नागपूर हे धान उत्पादनासाठी प्रसिद्ध जिल्हे असून या भागातील लाखो शेतकरी प्रामुख्याने धान पिकावर अवलंबून असणे, या जिल्ह्यांच्या कृषी अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा म्हणून धान पीक ओळखले जाते, तथापि, गेल्या काही वर्षांत हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, रोगराई तसेच उत्पादन खर्चात सातत्याने होत असलेली वाढ यामुळे या भागातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडणे, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मा. मुख्यमंत्री यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याचे सभागृहात स्पष्टपणे नमूद करणे, यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लवकरच अधिकृत निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन देणे, मात्र, आजपर्यंत या संदर्भातील अंतिम निर्णय जाहीर झालेला नसल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण होणे, धान पिकाच्या

लागवडीसाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीडनाशके, सिंचन, डिझेल, मजुरी, काढणी व मळणी यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणे, उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना शेतकऱ्यांना मिळणारा हमीभाव हा प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अपुरा ठरत असणे, परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले असून उत्पादन विक्रीनंतरही अपेक्षित आर्थिक परतावा मिळत नसणे, शासकीय खरेदी केंद्रांवरील विलंब, ऑनलाइन नोंदणीतील तांत्रिक अडचणी, ओलावा निकषांची कठोर अंमलबजावणी तसेच वेळेवर देयके न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा अधिकच वाढलेल्या असणे, अनेक शेतकरी खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विकण्यास बाध्य होणे, या पार्श्वभूमीवर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याची मागणी शासनाकडे सातत्याने केलेली असणे, सदर रक्कम मिळाल्यास शेतकऱ्यांना कर्जफेड, पुढील हंगामाची तयारी, शेतीसाठी आवश्यक निविष्ठांची खरेदी तसेच कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागविण्यास मोठा आधार मिळणे, सदर विषय सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्त्वाचा असून राज्यातील विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील लाखो धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताशी थेट संबंधित असल्यामुळे विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम जाहीर करावी व ती थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी अशी जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.सचिन कल्याण शेट्टी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र राज्यासह देशातील शेती व्यवस्था रासायनिक खतांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून झाली असून युरिया, फॉस्फरस व पालाश खतांसाठी भारताला आयातीवर अवलंबून राहावे लागणे, जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती व पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे खतांच्या उपलब्धतेवर व किंमतींवर गंभीर परिणाम होणे,आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये युरिया व पी-के खतांवरील अनुदान सुमारे १.६८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे, राज्य व केंद्र शासनाच्या जैविक व नैसर्गिक शेती अभियानांची अंमलबजावणी होत असली तरी ग्रामीण भागात अपेक्षित यश मिळालेले नसणे, जैविक निविष्ठा केंद्रांचे व्यापारीकरण, शेतकऱ्यांकडे देशी गायींचा अभाव आणि प्रत्यक्ष गोपालनाला पुरेसे प्रोत्साहन नसल्याने या योजनांचा परिणाम मर्यादित राहणे, राज्यातील खिल्लार, देवणी, लाल कंधारी, डांगी, गवळाऊ तसेच उच्च दर्जाचे दूध, शेण व गोमूत्रासाठी प्रसिद्ध असलेल्या गीर गाईंसह देशी गोवंशाच्या संख्येत गेल्या दोन दशकांत लक्षणीय घट होणे, देशी गोवंश व गीर गाईंच्या शेण-गोमूत्रावर आधारित नैसर्गिक शेतीमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवणे, रासायनिक खतांचा वापर कमी करणे, उत्पादन खर्च घटवणे तसेच अन्नातील रासायनिक अवशेष कमी करणे शक्य असल्याचे विविध अभ्यासांतून निदर्शनास येणे, राज्यातील देशी गोवंश व गीर गाय संवर्धनासाठी विशेष धोरण राबविणे, देशी गाय व गीर गाय पालन करणाऱ्या

शेतकऱ्यांना थेट प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत व डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियान व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाचे पुनर्मूल्यांकन करणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, देशी व गीर गायींच्या A2, दूध, तूप व इतर उत्पादनांसाठी स्वतंत्र बाजारपेठ व विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.जयंत पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सन २०१४-१५ मध्ये रु.३१५ कोटींची उलाढाल व रु.५० कोटींचा नफा कमावणाऱ्या हाफकिन महामंडळाची उलाढाल गेल्या ६-७ वर्षांत घसरून केवळ रु.७८ कोटींवर आली असून, महामंडळाला रु.४० कोटींचा तोटा झाला असणे, नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, तत्कालीन जबाबदार अधिकारी यांनी रु.२०० कोटींच्या पोलिओ टेंडरमध्ये घोटाळा करणे, रु.६१ कोटींचा कस्टम भुर्दंड बसवणे आणि केंद्र सरकारचा Venom व कोविड प्रकल्पांचा निधी परत पाठवून महामंडळाचे अतोनात नुकसान केल्याचे सिध्द होणे, महामंडळातील अंतर्गत गैरकारभारामुळे गेल्या ३ वर्षांत तब्बल २० ते २२ व्यवस्थापकीय संचालक (MD) बदलले गेले असणे, CAG' अहवालात दोषी सिद्ध झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर पूर्णवेळ आय.ए.एस. (IAS) अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची आवश्यकता, सध्या कच्च्या मालाअभावी उत्पादन ठप्प असल्याने, खेळते भांडवल (Working Capital) म्हणून शासनाने तातडीने विशेष आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ०१ जुलै, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.